मुंढवा पोलीस ठाणे
दि. २२/०९/२०१७

## अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीच्या सदस्यास हद्दपारीसह ब्लॅकलिस्ट कारवाई बाबत.

## प्रेसनोट

२/- दि.०७/०९/२०१७ रोजी आमचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली होती की, ए.बी.सी. रोड, लगत असलेल्या एका पानाच्या टपरी जवळ एक परदेशी नागरीक संशयीतरीत्या थांबतो व त्याच्याकडे काहीमुले येतात व तो त्या मुलांकडून पैसे घेवून त्यांना काहीतरी देतो व तो अंमली पदार्थ विक्री करत असावा अशी बातमी मिळाल्याने लागलीच त्या बातमीच्या अनुषंगाने आम्ही तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक पी.एल.गिरी व कर्मचारी यांना मिळालेल्या माहितीप्रमाणे खात्री करणेकामी व पुढील कार्यवाहीसाठी सुचना देवून रावाना केले असता, मिळालेल्या बातमीप्रमाणे ए.बी.सी. रोड, लगत असलेल्या एका पानाच्या टपरी जवळ एक परदेशी नागरीक संशयीतरित्या थांबलेला आढळून आला असता, त्याच्याकडे आमचे पथकाने अधिक चौकशी करीत असताना त्याने त्याचे सदर ठिकाणी येण्याच्या कारणाबाबत व पासपोर्ट व्हिसा बाबत काहीएक माहिती न देता पळून जावू लागल्याने त्यास पकडून पुढील चौकशी कामी मुंढवा पोलीस ठाणे या ठिकाणी आणून अधिक चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव Alih Christain Chidiebere असे सांगून नायजेरीयन देशाचा नागरीक असल्याचे सांगितले व नालासोपारा, मुंबई या ठिकाणी राहात असल्याचे व त्या ठिकाणीच पासपोर्ट असल्याचे सांगितले होते.

सदर नायजेरीयन देशाचा नागरीक नामे Alih Christain Chidiebere याचे बाबत अधिक गोपनीय चौकशी करता तो भारत देशामध्ये दि.२०/०७/२०१७ रोजी बिझनेस व्हिसावर आलेला होता व त्याचे बिझनेस व्हिसाची मुदत दि.१६/०५/२०१८ रोजीपर्यंत असल्याचे निदर्शनास आले. परंतु, तो मिळालेल्या बिझनेस व्हिसा नुसार कोणताही बिझनेस करीत नसल्याचे व तो पुणे शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी थांबून अंमली पदार्थ (ड्रग्ज) विक्री करीत असल्याचे व अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या टोळीचा सदस्य असल्याचे खात्रीशीररित्या समजून आलेने व त्याचे गैरधंद्यामुळे पुणे शहरातील लाखो शिक्षण घेत असलेले विद्यार्थी आमली पदार्थाच्या विळख्याखाली येतील व त्यास प्रतिबंध केला नाही तर तो समाज हिताच्या दृष्टीने घातक ठरणार आहे. याकरीता त्यास भारत देशातून कायमस्वरुपी हद्दपार करणे व पुन्हा भारतात येवूनये म्हणून ब्लॅकलिस्टकरणेकामी मा. पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा २, पुणे शहर तथा परकीय नागरीक नोंदणी अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांना दि.०९/०९/२०१७ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अनिल पात्रुडकर यांनी सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर केला असता, सदर नायजेरीयन देशाचा नागरीक Alih Christain Chidiebere याचेबाबत **रिस्ट्रीक्शन ऑर्डर** काढणेत आली होती व त्यानंतर त्यास हद्दपार व ब्लॅकलिस्टची कारवाई केलेने सदर नायजेरीयन नागरीकास दि.२२/०९/२०१७ रोजी त्याच्या मायदेशी पाठविण्यात आलेले आहे.

सदर नायजेरीयन नागरीक हा अंमली पदार्थ विक्री करणारा सदस्य असल्याचा संशय असल्यामुळे मा. श्रीमती रश्मि शुक्ला मॅडम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाप्रमाणे नायजेरीयन नागरीकास हद्दपारीसह ब्लॅकलिस्ट कारवाई मुंढवा पोलीस स्टेशनने केली आहे.